| MHKO140012082021 | नियमित दिवाणी दावा नं.१७९/२०२१<br>सिद्राय भावकान्ना सुनगार<br>विरुद्ध<br>शंकर शट्टाप्पा पाटील |
|---|---|

## निशाणी १७ खालील आदेश

## (दिनांक ११/०९/२०२५)

प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र.२ ते ४ यांनी त्यांचेविरुद्ध पारित लेखी जबाब नाहीचा आदेश रद्द होवून लेखी जबाब सादर करण्याची परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. त्यांनी असे कथन केले आहे की, वादींनी प्रस्तुत हक्कज्ञापन आणि वाटपासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.३ व ४ हे विवाहित असुन ते कर्नाटक व पुणे येथे राहण्यास आहेत. प्रतिवादी क्र.२ हे वयोवृध्द असुन त्यांना मुदतीच्या आत कैफियत दाखल करणे शक्य झाले नाही. बरेच दिवसापासुन प्रतिवादी यांचे विधिज्ञ आजारी असल्यामुळे तसेच प्रतिवादी यांना दाव्यासंबंधी महत्वाची जुनी दस्त उपलब्ध न झाल्यामुळे त्यांना कैफियत सादर करता आली नाही. त्यामुळे प्रतिवादी यांना दाव्यास लेखी जबाब सादर करण्यास विलंब झालेला आहे. तरी न्यायाच्या कारणास्तव विलंब माफ होवून प्रतिवादी यांना कैफियत सादर करण्याची परवानगी मिळणे आवश्यक आहे. करिता प्रस्तुतचा अर्ज.

३. वादीचे सुविद्य विधिज्ञ यांनी अर्जास म्हणणे सादर करुन विरोध दर्शविला आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही पक्षाचे सुविद्य विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरुन असे दिसून येते की, वादी यांनी प्रतिवादी यांच्याविरुध्द हक्कज्ञापन आणि वाटपासाठी दावा दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी मुदतीच्या आत कैफियत सादर केलेली नाही. सबब, त्यांनी लेखी जबाब सादर करण्यास विलंब केलेला आहे. त्यामुळे

त्यांच्याविरुध्द लेखी जबाब नाहीचा आदेश पारित झालेला आहे. परंतु प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जासोबत त्यांचा लेखी जबाब दाखल केला आहे. तसेच प्रस्तुत प्रकरणामध्ये अचल संपत्तीबाबत न्यायनिर्णय होणार असुन दावा गुणवत्तेवर निकाली काढण्यासाठी प्रतिवादी यांना कैफियत सादर करण्याची परवानगी देणे आवश्यक आहे. अर्ज मंजुर झाल्यास वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. कारण दाव्यामध्ये सुनावणी सुरु झालेली नाही. प्रकरणात गुणवत्तेवर न्यायनिर्णय होण्यासाठी प्रतिवादी यांना लेखी जबाब सादर करण्याची परवानगी देणे नैसर्गिक न्याय तत्वाच्याआधारे आवश्यक व न्यायोचित आहे. तसेच झालेल्या विलंबाबाबत खर्च बसविणे आवश्यक आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अर्ज रक्कम रु.६००/- बसवून मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.२ ते ४ यांचेविरुद्ध पारित विना लेखी जबाब आदेश रद्द करण्यात येतो.

३. खर्चाची रक्कम वादी यांना देण्यात यावी.

Digitally signed by WAMAN DIGAMBAR JADHAV
Date: 2025.09.11 17:34:11 +0530

दि.११/०९/२०२५

**(वामन डी. जाधव)**
**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, चंदगड**